॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

✽ सुविचार ✽
अपयश ही थांबण्याची वेळ नसून,
यशाकडे जाण्याची
पहिली पायरी असते.

■ अहिल्यानगर ■ सोमवार, दि. ८ जून २०२६ | ■ वर्ष ७ वे ■ अंक १४ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये | ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

# मध्यपूर्वेत पुन्हा महायुद्धाचा भडका?

## ट्रंप यांच्या आवाहनानंतरही इस्रायल-इराण आमनेसामने; युद्धविराम धोक्यात

**● तेहरान –** मध्यपूर्वेमध्ये पुन्हा एकदा दोन मोठ्या शक्तींमध्ये भीषण युद्ध पेटण्याची चिन्हे दिसत आहेत. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला लागू झालेल्या अत्यंत नाजूक युद्धविरामानंतर, इराणने थेट इस्रायलवर क्षेपणास्त्रे डागल्याचा दावा इस्रायलने केला आहे. इराणकडून झालेला हा अशा प्रकारचा पहिलाच मोठा हल्ला आहे. या नव्या हल्ल्यामुळे दोन्ही देशांमधील युद्ध संपवण्यासाठी सुरू असलेले आंतरराष्ट्रीय मध्यस्थीचे प्रयत्न आता कमालीचे गुंतागुंतीचे आणि कठीण झाले आहेत.

या ताज्या वादाची सुरुवात रविवारी झाली, जेव्हा इस्रायलने लेबनानची राजधानी बेरूतच्या दक्षिणी उपनगरांवर भीषण हल्ला केला होता. या हल्ल्यानंतर इराणने इस्रायलला चोख प्रत्युत्तर देण्याची थेट चेतावणी दिली होती. इस्रायलच्या म्हणण्यानुसार, इराण समर्थित दहशतवादी संघटना हिजबुल्लाने रविवारी दिवसा उत्तर इस्रायलवर जोरदार गोळीबार केला होता, त्याला प्रत्युत्तर म्हणून इस्रायलने बेरूतवर हा हल्ला चढवला.



विशेष म्हणजे, अमेरिका आणि लेबनान-इस्रायलच्या सरकारांमध्ये झालेल्या दीर्घ चर्चे नंतर काही दिवसांपूर्वीच एका शांतता करारावर सहमती झाली होती. मात्र, हिजबुल्लाने हा करार पूर्णपणे फेटाळून लावला होता. इस्रायलने बेरूतच्या दक्षिणी उपनगरात असलेल्या हिजबुल्लाच्या कमांड सेंटरला लक्ष्य केले. या हल्ल्याबाबत इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी आपल्या मंत्रिमंडळाला सांगितले की, आम्ही त्यांच्यावर जोरदार प्रहार करत आहोत आणि हिजबुल्ला आता पळ काढत आहे, याची आम्हाला पूर्ण कल्पना आहे. दरम्यान, लेबनानच्या आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, एका निवासी इमारतीवर झालेल्या या इस्रायली हल्ल्यात २ जणांचा मृत्यू झाला असून २० लोक जखमी झाले आहेत.

इराणने या घटनेवर तीव्र आक्षेप घेतला असून, बेरूतवरील या हल्ल्यामुळे संपूर्ण मध्यपूर्वेमध्ये पूर्ण क्षमतेने महायुद्ध पेटू शकते, असा इशारा दिला आहे. इराणची प्रमुख अट अशी आहे की, अमेरिका आणि इस्रायलसोबत जे काही शांतता करार होतील, त्यामध्ये लेबनानमधील संघर्ष पूर्णपणे थांबवण्याचा मुद्दा समाविष्ट असणे अनिवार्य आहे.

परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी या प्रकरणात थेट मध्यस्थी केली आहे. ट्रंप यांनी स्पष्ट केले आहे की, ते इस्रायली पंतप्रधान नेतन्याहू यांच्यावर इराणला पुन्हा प्रत्युत्तर न देण्यासाठी दबाव आणत आहेत. जर यापुढे कोणतीही लष्करी कारवाई झाली, तर त्याचा थेट परिणाम अमेरिका आणि इराण दरम्यान होणाऱ्या आगामी महत्त्वपूर्ण करारावर होऊ शकतो. एक्सिओसच्या रिपोर्टनुसार, राष्ट्राध्यक्ष ट्रंप यांनी नेतन्याहू यांना स्पष्ट शब्दांत सुनावले आहे की, दोन्ही बाजूंनी एकमेकांवर हल्ले करून झाले आहेत, त्यामुळे आता हा तणाव अधिक वाढवू नका आणि शांतता राखा. आता संपूर्ण जगाचे लक्ष इस्रायलच्या पुढील पाऊलाकडे आणि ट्रंप यांच्या दबावाचा नेतन्याहू यांच्यावर काय परिणाम होतो, याकडे लागले आहे.

## SPOT NEWS

### एमपीएससी परीक्षा केंद्रावर दीड तास अगोदर पोहचणे अनिवार्य

**● मुंबई –** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नुकत्याच झालेल्या नागरी सेवा पूर्व परीक्षेमध्ये एका दिवसात उत्तर तालिका जाहीर करण्याचा नवा रेकॉर्ड आयोगाने केला. त्यानंतर एमपीएससी एक धडाकेबाज निर्णय घेत आहे. रविवार, दिनांक १४ जून, २०२६ रोजी नियोजित महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर होणार आहे. या परीक्षेसाठी आयोगाने नियम कठोर. केले आहेत. एमपीएससी च्या परीक्षा द्यायच्या असतील तर आता उमेदवारांना दीड तास आधी परीक्षा केंद्रावर जावे लागणार आहे. महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षेकरीता प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावरील प्रवेशपात्र उमेदवारांच्या खात्यामध्ये उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. परीक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी आयोगाच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट केलेले मूळ स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

### कर्जमाफीचे काही निकष अडचणीचे; शरद पवार

**● मुंबई –** राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीबाबत घालण्यात आलेल्या अटी आणि पात्रतेच्या निकषांमुळे मोठ्या संख्येने शेतकरी योजनेबाहेर राहतील, अशी टीका होत आहे. यावर प्रतिक्रिया देताना शरद पवार म्हणाले की, शेतक-यांच्या तक्रारी गांभीर्याने घेण्याची गरज आहे. त्यांनी स्पष्ट केले की, सरकारचा निर्णय पूर्णपणे चुकीचा आहे असे म्हणणे योग्य नाही. मात्र त्यामध्ये काही व्यावहारिक अडचणी आहेत. त्यामुळे हा निर्णय थेट फेटाळण्याऐवजी त्यातील त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. राज्यातील शेतकरी कर्जमाफी, वादळी पावसामुळे झालेले पिकांचे नुकसान आणि इंडिया आघाडीची आगामी रणनीती या महत्त्वाच्या मुद्द्यांवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत भूमिका स्पष्ट केली. दिल्लीमध्ये आज होत असलेल्या इंडिया आघाडीच्या बैठकीबाबत बोलताना शरद पवार म्हणाले की, देशातील एकूण राजकीय परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली आहे.

# अमेरिकेने युद्धविराम मोडला

**● तेहरान –** इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने शनिवारी अमेरिकेवर युद्धविराम मोडल्याचा आरोप केला. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे म्हणणे आहे की, अमेरिका तणाव कमी करण्याऐवजी आपल्या लष्करी कारवाईने संपूर्ण प्रदेशाच्या सुरक्षेला धोका निर्माण करत आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अमेरिकेने सीरिक प्रदेश आणि केशम बेटावरील इराणच्या किनारी रडार आणि पाळत ठेवणाऱ्या केंद्रांवर हल्ला केला, जो युद्धविरामाचे स्पष्ट उल्लंघन आहे. इराणने म्हटले आहे की, या हल्ल्यांनंतर जी काही परिस्थिती निर्माण होईल आणि त्याचे जे काही परिणाम होतील, त्याची संपूर्ण जबाबदारी अमेरिकेची असेल. लेबनॉनमध्ये मृतांचा आकडा ३,५९३ वर पोहोचला असून २ मार्चपासून सुरू असलेल्या इस्रायली हल्ल्यांमध्ये आतापर्यंत ३,५९३ लोकांचा मृत्यू झाला असून १०,९९० लोक जखमी झाले आहेत. गेल्या २४ तासांत ३५ लोकांचा बळी गेला आणि १२० लोक जखमी झाले. शनिवारी झालेल्या इस्रायली हल्ल्यांमध्ये लेबनानी लष्कराच्या एका ब्रिगेडियर जनरलसह १० लोकांचा मृत्यू झाला.

हल्ल्यांनंतर अनेक भागांतील लोकांना घरे रिकामी करण्याचे आदेश देण्यात आले. अमेरिकेने होर्मुजच्या दिशेने जात असलेले ४ इराणी ड्रोन पाडल्याचा आणि केशम बेटावरील रडार साइट्सवर हल्ला केल्याचा दावा केला. प्रत्युत्तरादाखल, इराणने कुवेत आणि बहरीनच्या दिशेने ७ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली, जी रोखल्याचा दावा करण्यात आला.

# किमान १५ जूनपर्यंत राज्यात सर्वत्र मान्सूनच्या पावसाची शक्यता कमी

## मान्सून सर्वदूर सक्रिय नाही । शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

**● मुंबई । वीरभूमी –** मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये ९ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र त्यानंतर किमान १५ जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर तसेच मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होण्याची शक्यता हवामानाच्या सध्याच्या अंदाजातून दिसून येत आहे. त्यामुळे या कालावधीत राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी आहे.

सध्याच्या हवामान अंदाजानुसार किमान १५ जूनपर्यंत विदर्भ, मराठवाडा, खानदेश, आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये दुपारनंतर ढग आणि विखुरलेल्या स्वरूपाचा मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तथापि, हा पाऊस व्यापक क्षेत्रात पेरणीस पोषक ठरेल, अशी परिस्थिती अद्याप दिसत नाही.

दरम्यान, किमान १२ जूनपर्यंत राज्यातील अनेक भागांमध्ये कमाल तापमान सध्याप्रमाणेच उच्च राहण्याची शक्यता आहे. विदर्भ व खानदेशात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक, तर मराठवाड्यात ३५ ते ४० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याचा अंदाज आहे.

कृषी व आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून शेतकरी व नागरिकांना पुढीलप्रमाणे आवाहन करण्यात येत आहे : आगामी वादळी पावसावर अवलंबून राहून पेरणीची घाई करू नये. विजांच्या कडकडाटाच्या वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ थांबणे टाळावे

# रेव्ह पार्टी करणाऱ्या १०० पेक्षा जास्त मुला-मुलींना पुणे पोलिसांनी पकडले

## पुणे पोलिसांची मोठी कारवाई । पोलिसांकडून मोठा दारुचा साठाही जप्त

**● पुणे । वीरभूमी –** जिल्ह्यातील तुळापूर गावच्या हद्दीतील एका आलिशान बंगल्यात सुरू असलेल्या कथित रेव्ह पार्टीवर पुणे पोलिसांनी मध्यरात्री छापा टाकत मोठी कारवाई केली. ज्यावेळी गुन्हे शाखेकडून हा छापा टाकण्यात आला, त्यावेळी तिथे १०० च्या जवळपास मुली-मुले उपस्थित होते. धक्कादायक बाब म्हणजे सर्व मुले-मुली नशेत होते. काही अल्पवयीन मुले देखील तिथे उपस्थित होते. दारूचा मोठा साठा देखील होता.

पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. या पार्टीचे आयोजन केलेल्याची चौकशी केली जात आहे. पुण्यात मागील काही दिवसांपासून रेव्ह पार्टीचा मुद्दा तूफान चर्चेत आहे. घटनास्थळावरून नशेसाठी वापरले जाणारे विविध पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. रेव्ह पार्टीच्या ठिकाणी पोलिसांचा तपास सुरू आहे.

या रेव्ह पार्टीबद्दल तेजस्विनी सातपुते अप्पर पोलिस आयुक्त पुणे यांनी मोठी माहिती दिली. अप्पर पोलिस आयुक्त तेजस्विनी सातपुते यांनी म्हटले की, लोणीकंद पोलिस स्टेशनच्या हद्दीमध्ये तुळापूर परिसरात मध्यरात्री पार्टी सुरू होती आणि यासाठी कोणतीही परवानगी न घेता ही पार्टी सुरू होती. यावेळी १००पेक्षा जास्त मुले आणि मुली उपस्थित होते. यामध्ये अनेक तरुण २१ वर्षाच्या आतील असल्याची संभावना वाटत आहे. ज्यांनी हा बंगला उपलब्ध करून दिला त्याचा यामध्ये काही संबंध आहे का? याबाबत पडताळणी होत आहे.



लाखो रुपयांचे मद्य येथे आढळून आले आहे. यानुसार गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. येथे मद्य, तंबाखूजन्य पदार्थ आणि गांजा आढळून आला आहे. येथील पार्टीसाठी असलेले तरुण हे कोणत्या भागातून आले याचा तपास सुरू आहे. पार्टीत सहभागी झालेल्या मुला मुलींची कसून चौकशी पोलिसांकडून केली जात आहे.

### रेव्ह पार्ट्या करणा-यांवर थेट 'मोक्का' लावा! : मंत्री संजय शिरसाठ यांची मागणी

■ महाराष्ट्रात रेव्ह पार्ट्यांचे प्रमाण वाढत चालले आहे, त्याला काही लोक पाठिंबा देत आहेत. तरुण मुले अशा पार्ट्यांना जातात अशाने तरुण पिढी बर्बाद होत आहे. पोलिसांनी यांच्यावर कारवाई केली पाहिजे. रेव्ह पार्ट्या करणाऱ्यांवर मोक्का लावला पाहिजे, असे शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी म्हटले. संजय शिरसाट म्हणाले की, कंत्राटदार काम घेतात आणि ते दुसऱ्या कंत्राटदाराला देतात. दोघांनी आपला नफा काढल्याने ते काम चांगले होत नाही. मुख्यमंत्र्यांना मी याबाबत माहिती दिली आहे. ते यावर कारवाई करणार आहेत. युद्धामुळे गॅस सिलिंडरचे दर वाढले आहेत. पेट्रोल-डिझेल बंद झाले तरच या किमती वाढणे बंद होणार नाही.

# SPOT NEWS

## निमगाव वाघा येथे जागतिक पर्यावरण दिन उत्साहात

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. नवनाथ विद्यालय, स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. नवनाथ विद्यालयाच्या परिसरात विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक उत्तम कांडेकर आणि डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी उपशिक्षक शरद भोस, मंदा साळवे, स्वाती इथापे, तृप्ती वाघमारे, प्रमोद थिटे, निकिता रासकर–शिंदे, तसेच श्री नवनाथ युवा मंडळाचे अध्यक्ष पै. संदीप डोंगरे, प्रशांत जाधव, बाळासाहेब डोंगरे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, युवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना पै. नाना डोंगरे यांनी पर्यावरणाच्या वाढत्या समस्यांबाबत चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, मानवाने स्वतःच्या विकासासाठी निसर्गाची मोठ्या प्रमाणावर हानी केली आहे. जंगलतोड, प्रदूषण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिवापर यामुळे पर्यावरणीय समतोल ढासळला असून संपूर्ण सजीवसृष्टीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. भविष्यातील संकटे टाळण्यासाठी वृक्षारोपणाबरोबरच वृक्षांचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. निसर्गाशी सुसंवाद साधूनच मानवजातीचे भविष्य सुरक्षित राहू शकणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# वादळी वाऱ्याने कडगाव येथे घर कोसळून महिलेचा मृत्यू

### पत्र्याचा जबर मार लागल्याने समाबाई शिरसाट यांचा मृत्यू । पाच ते सहा जण जखमी

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी तालुक्यातील कडगाव येथे शुक्रवारी (दि. ५ जून) रात्री झालेल्या वादळी पाऊस व जोरदार वाऱ्यामुळे घराची पडझड होऊन एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्घटनेत कुटुंबातील पाच ते सहा जण जखमी झाले असून घरासह संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कडगाव येथील शेतकरी विलास किसन शिरसाट यांच्या घरावर रात्री साडेनऊ ते पावणेदहा वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्याचा जोरदार फटका बसला. वीजांचा कडकडाट, मुसळधार पाऊस आणि वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे घरातील सर्व सदस्य पडवीत झोपले होते. त्याचवेळी अचानक आलेल्या सुसाट वाऱ्याने घरावरील पत्रे उडून गेली. तसेच पत्र्यावरील भिंत कोसळल्याने पडवीत झोपलेल्या कुटुंबीयांवर ढिगारा पडला.

या घटनेत घरावरील पत्र्याचा जबर मार समाबाई विलास शिरसाट यांना लागल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्घटनेत



विलास शिरसाट, सागर शिरसाट, विराज शिरसाट, अलका शिरसाट यांच्यासह अन्य काही कुटुंबीय जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

वादळी वाऱ्यामुळे घराची पूर्ण पडझड झाली असून अनेक पत्रे वाऱ्याने उडून घरासमोर पडली. घरातील संसारोपयोगी साहित्याचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या दुर्घटनेमुळे शिरसाट कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले आहे.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी मदतीसाठी धाव घेतली. पंचनामा व मदतकार्याची प्रक्रिया सुरू असून प्रशासनाने नुकसानग्रस्त कुटुंबाला तातडीची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत.

### वादळाचा एका क्षणात घात

■ वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे शिरसाट कुटुंबीय पडवीत झोपले होते. अचानक आलेल्या प्रचंड वाऱ्याने घरावरील पत्रे उडाली आणि भिंत कोसळली. पत्र्याचा जबर मार समाबाई शिरसाट यांना लागल्याने त्यांचा मृत्यू झाला. काही क्षणांतच संपूर्ण घराची पडझड होऊन कुटुंबावर मोठे संकट ओढवले.

### तातडीच्या मदतीची मागणी

■ घराची संपूर्ण पडझड झाल्याने शिरसाट कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शासनाने विशेष मदत जाहीर करून निवारा, जीवनावश्यक वस्तू आणि आर्थिक सहाय्य तातडीने उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## घंटागाड्यांमध्ये ओला-सुका कचऱ्यासाठी स्वतंत्र कप्पे करा; कष्टकरी पंचायतची नगर महापालिकेकडे मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी, शास्त्रशुद्ध आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी कचरा संकलन करणाऱ्या घंटागाड्यांमध्ये ओला व सुका कचरा वेगळा ठेवण्यासाठी स्वतंत्र कप्प्यांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतचे जिल्हा समन्वयक विकास भाऊसाहेब उडाणशिवे यांनी केली आहे. नागरिकांकडून कचरा वर्गीकरणाबाबत सातत्याने जनजागृती केली जात असताना प्रत्यक्ष कचरा संकलन व्यवस्थेत आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने संपूर्ण प्रक्रियेची परिणामकारकता कमी होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

शहरातील विविध भागांत नागरिकांना घरगुती पातळीवर ओला आणि सुका कचरा वेगळा करून देण्याचे आवाहन महानगरपालिकेकडून सातत्याने केले जाते. अनेक नागरिकही पर्यावरणाच्या दृष्टीने जागरूकता दाखवत कचरा वर्गीकरण करून देत आहेत. मात्र, हा वर्गीकृत कचरा संकलित करण्यासाठी येणाऱ्या अनेक घंटागाड्यांमध्ये स्वतंत्र कप्प्यांची व्यवस्था नसल्याचे चित्र दिसून येत आहे. परिणामी नागरिकांनी वेगळा केलेला कचरा संकलन प्रक्रियेदरम्यान पुन्हा एकत्र होण्याची शक्यता निर्माण होत असून, त्यामुळे कचरा वर्गीकरणाच्या संकल्पनेलाच धक्का बसत असल्याचे उडाणशिवे यांनी नमूद केले.

याबाबत बोलताना सामाजिक कार्यकर्ते तथा कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतचे जिल्हा समन्वयक विकास भाऊसाहेब उडाणशिवे म्हणाले की, घनकचरा व्यवस्थापन ही केवळ नागरिकांची जबाबदारी नसून प्रशासनाचीही तितकीच महत्त्वाची भूमिका आहे. नागरिकांनी नियमांचे पालन करून ओला व सुका कचरा वेगळा दिल्यानंतर तो तसाच स्वतंत्र स्वरूपात प्रक्रिया केंद्रापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्यासाठी घंटागाड्यांमध्ये स्वतंत्र कप्पे असणे ही मूलभूत गरज आहे. अन्यथा नागरिकांच्या प्रयत्नांवर पाणी फेरले जाते आणि संपूर्ण व्यवस्थेचा उद्देशच निष्फळ ठरतो.

त्यांनी पुढे सांगितले की, शहरातील सर्व घंटागाड्यांचे महानगरपालिकेने तातडीने सर्वेक्षण करून ज्या वाहनांमध्ये स्वतंत्र कप्प्यांची व्यवस्था नाही, त्या वाहनांमध्ये आवश्यक बदल करावेत. ओला आणि सुका कचरा वेगळा संकलित व वाहतूक करण्यासाठी आवश्यक यंत्रणा उभारल्यास कचऱ्याचे पुनर्वापर, पुनर्प्रक्रिया आणि विल्हेवाट अधिक परिणामकारकपणे करता येईल. यामुळे शहरातील कचऱ्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल तसेच पर्यावरण संरक्षणालाही हातभार लागेल. उडाणशिवे यांनी नागरिकांमध्ये जनजागृतीबरोबरच प्रत्यक्ष अंमलबजावणी, नियमित देखरेख आणि जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. घनकचरा व्यवस्थापन ही केवळ कागदोपत्री योजना न राहता प्रत्यक्षात प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रशासनाने सर्व घटकांना सोबत घेऊन काम करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी कचरा वेचक, भंगार कामगार आणि पुनर्वापर क्षेत्रात कार्यरत असलेल्या कामगारांच्या भूमिकेचाही विशेष उल्लेख केला. हे कामगार शहरातील घनकचरा व्यवस्थापन साखळीतील महत्त्वाचा घटक असून पर्यावरण संवर्धनात त्यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि कौशल्याचा उपयोग करून अधिक सक्षम आणि परिणामकारक कचरा व्यवस्थापन प्रणाली विकसित करता येऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक बनविण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने घनकचरा व्यवस्थापनात आवश्यक सुधारणा करून घंटागाड्यांमध्ये ओला व सुका कचरा संकलनासाठी स्वतंत्र कप्प्यांची व्यवस्था तातडीने करावी, अशी मागणी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत यांच्या वतीने करण्यात आली आहे.

## वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीची बिपीनदादा कोल्हे यांनी केली पाहणी

**● कोपरगाव । वीरभूमी–**

तालुक्यात नुकत्याच झालेल्या वादळी वाऱ्यामुळे धामोरी, रवंदा, ब्राह्मणगाव, टाकळी व परिसरातील अनेक ठिकाणी नुकसान झाले.यासह अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी केली. या नुकसानीची पाहणी करून त्यांनी नुकसानग्रस्त नागरिकांशी संवाद साधला व त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी घरांचे पत्रे उडून गेले असून झाडे उन्मळून पडल्याने तसेच कांदाचाळी, शेती पूरक व्यवसायांचेही मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः धामोरी येथील नर्सरीचे, कांदा चाळींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. या ठिकाणी भेट देऊन बिपीनदादा कोल्हे यांनी नुकसानीची माहिती घेत संबंधितांना धीर दिला.



यावेळी त्यांनी प्रशासनाने तातडीने नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करून शासनाकडून काही मदत मिळण्यासाठी लवकरात लवकर प्रयत्न करावे, अशी सूचना केली.नागरिकांना दिलासा मिळावा आणि त्यांचे नुकसान भरून निघण्यासाठी हातभार लागावा यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत आलेल्या नागरिकांच्या पाठीशी आपण ठामपणे उभे आहोत, असा विश्वास बिपीनदादा कोल्हे यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच शासन व प्रशासनाने समन्वय साधून नुकसानग्रस्तांना दिलासा देण्यासाठी आ.विवेकभैय्या कोल्हे यांनीही सूचना दिलेल्या आहेत त्याप्रमाणे प्रशासनाने अहवाल शासनाला सादर करावा.या पाहणी दौऱ्यामुळे नुकसानग्रस्त नागरिकांना दिलासा मिळाला असून त्यांच्या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले आहे.

# पारनेर येथे भाजपची मतदार यादी शुद्धीकरण कार्यशाळा उत्साहात

### आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन । दीपक इंगळे व अतुल माने यांची महत्त्वाच्या पदांवर नियुक्ती

**● पारनेर । वीरभूमी–**

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या पारनेर विधानसभा मतदारसंघाच्या वतीने मतदार यादी शुद्धीकरण मोहिमेअंतर्गत विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी (दि. ७ जून २०२६) पारनेर येथील भाजप कार्यालयात पार पडलेल्या या कार्यशाळेत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या कार्यशाळेस भाजपचे प्रदेश सरचिटणीस सुनील राणे आणि भाजप अहिल्यानगर दक्षिणचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव भालसिंग हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

कार्यशाळेला संबोधित करताना मान्यवरांनी मतदार यादीच्या अचूकतेचे महत्त्व अधोरेखित केले. लोकशाहीची मुळे अधिक भक्कम करण्यासाठी मतदार यादी त्रुटीमुक्त असणे आवश्यक आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने तळागाळातील मतदारांपर्यंत पोहोचून त्यांच्या नोंदींची पडताळणी करावी आणि त्रुटी दूर करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यशाळेत मतदार यादीतील नावे शोधणे, वगळलेली नावे समाविष्ट करणे, पत्ता बदलणे तसेच इतर तांत्रिक बाबींचे सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने संघटनात्मक बांधणी आणि निवडणूक व्यवस्थापनासाठी ही कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमाचे औचित्य साधून भाजपमध्ये कार्यरत असलेल्या दोन निष्ठावान कार्यकर्त्यांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या. दीपक इंगळे यांची भाजप सांस्कृतिक सेलच्या जिल्हा सरचिटणीसपदी, तर अतुल माने यांची भाजप जिल्हा कार्यकारिणीच्या जिल्हा चिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी भाजप राज्य परिषद सदस्य विश्वनाथदादा कोरडे, जिल्हा सरचिटणीस सुभाषराव दुधाडे, भाजप मंडल अध्यक्ष राहुल शिंदे पाटील, शिवाजीकाका खिलारी, सचिन वराळ पाटील, दत्तानाना पवार यांच्यासह मोठ्या संख्येने लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.




कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी संयोजन करण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## SPOT NEWS

### सामाजिक कार्यकर्ते प्रकाश थोरात यांचा हेल्पिंग हॅण्ड फाऊंडेशनतर्फे गौरव

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

पीपल्स हेल्पलाईनचे सामाजिक कार्यकर्ते प्रकाश थोरात यांच्या सामाजिक कार्याबद्दल हेल्पिंग हॅण्ड फाऊंडेशनच्या नर्सिंग कॉलेजच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला. समाजातील वंचित, दुर्बल, पीडित आणि अन्यायग्रस्त घटकांच्या हक्कांसाठी सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला. यावेळी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हेल्पिंग हॅण्ड फाऊंडेशनच्या प्रमुख निर्मलाताई केदारी होत्या. त्यांच्या हस्ते थोरात यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी फाऊंडेशनचे पदाधिकारी, नर्सिंग कॉलेजचे प्राध्यापक, विद्यार्थी तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बोलताना निर्मलाताई केदारी यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी युवकांनी पुढाकार घेत सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

### हज यात्रेकरूंच्या लगेज प्रकरणावर उलेमा बोर्ड आक्रमक

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

हज यात्रेकरूंच्या लगेजमध्ये झालेल्या कथित चोरी, छेडछाड आणि सामान वितरणातील विलंबाच्या प्रकरणावर ऑल इंडिया उलेमा बोर्ड रजिस्टर्डने तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित यंत्रणांकडे कठोर प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रकरणाची तात्काळ दखल न घेतल्यास देशव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही बोर्डाने दिला आहे. ऑल इंडिया उलेमा बोर्ड रजिस्टर्डचे नॅशनल जनरल सेक्रेटरी अंजर अन्वर खान यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, हज कमिटी ऑफ इंडिया, केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालय, केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू, परराष्ट्र मंत्रालय तसेच विमानतळ प्राधिकरण यांनी हज यात्रेकरूंना त्यांचे सामान वेळेवर का मिळाले नाही याबाबत स्पष्टीकरण द्यावे. खान यांनी प्रश्न उपस्थित करताना म्हटले की, इतकी कडक सुरक्षा व्यवस्था, देखरेख आणि तपासणी यंत्रणा अस्तित्वात असताना लगेजमधून चोरी आणि वस्तूंची छेडछाड कशी झाली? यात्रेकरूंच्या बॅगांचे लॉक कोणी तोडले? हज यात्रेकरूंचे सामान सुरक्षित ठेवण्यात संबंधित यंत्रणा अपयशी ठरत असतील तर त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार? ऑल इंडिया उलेमा बोर्ड रजिस्टर्डने या प्रकरणात तातडीने कारवाई करण्याची मागणी करत काही प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये प्रत्येक विमानतळ आणि लगेज हबमधील सीसीटीव्ही फुटेजची सखोल तपासणी करणे, चोरी गेलेले मौल्यवान सामान शोधून परत मिळवून देणे, प्रभावित यात्रेकरूंना संपूर्ण नुकसानभरपाई देणे, दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करणे तसेच विमानतळ प्राधिकरण आणि संबंधित यंत्रणांच्या निष्काळजीपणाची उच्चस्तरीय चौकशी करणे यांचा समावेश आहे. या प्रकरणाचा तात्काळ निकाल लावण्यात आला नाही तर ऑल इंडिया उलेमा बोर्ड रजिस्टर्ड देशभर आंदोलन आणि जनजागृती मोहीम सुरू करण्यास भाग पडेल, असा इशाराही बोर्डाने दिला आहे.

# पारनेरमध्ये सोमवारी पोलिसांच्या निषेधार्थ 'जन आक्रोश मोर्चा'

## महापुरुषांची बदनामी करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी । आंबेडकरी व पुरोगामी संघटनांचे आवाहन

**पारनेर । वीरभूमी–**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत कथित आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, तसेच पोलिसांनी या प्रकरणात दाखविलेल्या कथित उदासीनतेच्या निषेधार्थ पारनेर तालुक्यातील विविध पुरोगामी व आंबेडकरी संघटनांच्या वतीने सोमवार, दि. ८ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पारनेर येथे 'जन आक्रोश मोर्चा' आयोजित करण्यात आला आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, देशात आणि महाराष्ट्रात काही प्रवृत्तींमार्फत बहुजन महापुरुषांविषयी चुकीची माहिती पसरवून समाजात तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न होत आहेत. अशा घटनांमुळे सामाजिक सलोखा आणि संविधानिक मूल्यांना धक्का पोहोचत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे.

पत्रकानुसार, डॉ. मंगेश बेकारसे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत



कथित आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी कठोर कारवाईची मागणी करण्यात आली होती. मात्र, पोलिसांनी योग्य ती कारवाई न केल्याचा आरोप आंदोलकांनी केला असून त्याविरोधात हा मोर्चा काढण्यात येत असल्याचे सांगण्यात आले आहे.

मोर्चाची सुरुवात पारनेर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथून होणार असून मुख्य पेठ मार्गे तो पारनेर पोलीस स्टेशनवर धडकणार आहे. मागण्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही संयोजन समितीने दिला आहे.

या निवेदनावर राजेंद्र करंदीकर, बाळासाहेब पातारे, राजेंद्र उबाळे, अमित जाधव, विशाल पटेकर, संभाजी पटेकर, भागाशेठ सोनवणे, संकेत पटेकर, किरण सोनवणे, प्रदीप नगरे, गौतम पटेकर, संतोष अडसूळ, प्रदीप कसबे, संजीवन सोनवणे, ईश्वर सोनवणे, निलेश पटेकर, अतुल भालेराव, निखिल गायकवाड आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन

महापुरुषांचा सन्मान, सामाजिक सलोखा आणि संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी पारनेर तालुक्यातील सर्व पुरोगामी, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते तसेच न्यायप्रेमी नागरिकांनी सोमवार, दि. ८ जून रोजी सकाळी ११ वाजता मोठ्या संख्येने 'जन आक्रोश मोर्चा'मध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रवरा कालव्यातून आवर्तन सोडण्याचे पालकमंत्र्यांचे निर्देश

**शिर्डी । वीरभूमी–**

उन्हाळ्यातील पिण्याच्या पाण्याची वाढती मागणी लक्षात घेऊन प्रवरा डाव्या व उजव्या कालव्यातून सिंचन तसेच बिगर सिंचनाचे दुसरे एकत्रित आवर्तन तातडीने सोडण्यात येणार आहे. नदीकाठच्या गावांना मोठा दिलासा देणारे हे आवर्तन सोडण्याचे निर्देश जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत.

सध्या उन्हाची तीव्रता वाढल्याने बहुतांश गावांतील पाण्याचे स्रोत आटले आहेत. शेतीसह पाणीपुरवठा योजनांना पाणी उपलब्ध होत नसल्याने नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासह जनावरांसाठी पाणी मिळावे, अशी शेतकरी व नदीकाठच्या गावांकडून मोठ्या प्रमाणात मागणी होत होती.



लोणी येथे आयोजित जनता दरबाराच्या माध्यमातून आमदार अमोल खताळ यांच्यासह शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने या प्रश्नावर तातडीने निर्णय घेण्याची विनंती केली होती.

या विनंतीची दखल घेत धरणातील पाण्याच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला व त्यानंतर हे एकत्रित आवर्तन सोडण्याचा निर्णय झाला. सुरू होणाऱ्या या आवर्तनातून पाण्याचा अपव्यय होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

# भट्टड हॉस्पिटल व मॅगो इंटरनॅशनल प्री स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबीर उत्साहात

**श्रीगोंदा । वीरभूमी–**

दौंड येथील भट्टड हॉस्पिटल आणि मॅगो इंटरनॅशनल प्री स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने ३ ते १० वयोगटातील मुलांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण ७५ मुलांची नेत्र तपासणी करण्यात आली.

यावेळी दौंड येथील सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रेमकुमार भट्टड यांचे चिरंजीव डॉ. चिराग भट्टड यांनी मुलांच्या डोळ्यांच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन केले. हे सुंदर जग अनुभवण्यासाठी डोळ्यांचे आरोग्य अत्यंत महत्त्वाचे आहे. मुलांच्या प्रत्येक हालचालीवर पालक लक्ष ठेवतात, मात्र त्यांच्या दृष्टीत काही समस्या आहेत का हे बालपणातच ओळखणे आवश्यक असते. वेळेत निदान झाल्यास भविष्यातील गंभीर अडचणी टाळता येऊ शकतात,



असे त्यांनी सांगितले.

शिबिरामध्ये तपासणीदरम्यान सुमारे ३० मुलांना चष्म्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. तसेच काही मुलांना रेटिना तपासणीची गरज असल्याने त्यांना वेळ देऊन दौंड येथील भट्टड हॉस्पिटलमध्ये मोफत पुढील तपासणी करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. चिराग भट्टड यांनी दिली.

दौंड येथील सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रेमकुमार भट्टड यांनी आपल्या वैद्यकीय सेवेसोबतच सामाजिक बांधिलकी जपत नेत्रदान चळवळ, मोफत नेत्र तपासणी शिबिरे तसेच पंढरपूर वारी मधील वारकऱ्यांची मोफत नेत्र तपासणी यांसारखे उपक्रम सातत्याने राबवले आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेत डॉ. चिराग भट्टड हेही सेवाभावी कार्यात सक्रिय सहभागी होत असून त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# मातृसेवा हीच आदर्श सेवा : पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे

## दहिगाव-ने येथे मातोश्री बसंताबाई लोखंडे यांच्या ९१ व्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा

**शेवगाव । वीरभूमी–**

प्रत्येक व्यक्तीचे जीवन समृद्ध आणि संस्कारसंपन्न बनविण्यात आईचा सिंहाचा वाटा असतो. आईचे संस्कार हीच मानवी जीवनातील खरी अक्षय शिदोरी आहे. त्यामुळे मातृसेवा हीच आदर्श सेवा आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे यांनी केले.

दहिगाव-ने येथील मातोश्री बसंताबाई दत्तात्रय लोखंडे यांच्या ९१ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार डॉ. नरेंद्र घुले होते. प्रमुख पाहुणे म्हणून मॅगसेसे पुरस्कार विजेते पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे, डॉ. सौ. मंदाकिनी आमटे, सौ. राजश्रीताई चंद्रशेखर घुले पाटील, महंत कैवल्यानंद शास्त्री महाराज आणि महंत उद्धवजी मंडलिक महाराज उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. मातोश्री बसंताबाई लोखंडे यांच्या इच्छेनुसार आनंदवन परिवारातील ज्येष्ठ सदस्या डॉ. मंदाकिनी आमटे यांच्या हस्ते लोखंडे कुळातील सदस्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

बसंताबाई यांच्या ९१ व्या वाढदिवसानिमित्त ९१ वृक्षांचे वृक्षप्रेमी कुटुंबीयांना वाटप करण्यात आले. अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त लोखंडे परिवाराच्या वतीने सप्ताह व ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज शिंदे (अध्यापक व विश्वस्त, जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, आळंदी) यांच्या श्रीरामकथेचे आयोजन करण्यात आले होते.

सप्ताहादरम्यान आठ दिवस विविध धार्मिक, सामाजिक व आरोग्यविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दररोज पहाटे ४ ते ५ या वेळेत काकडा भजन, त्यानंतर सकाळी ५ ते ७ या वेळेत युवकांसाठी प्रसिद्ध आरोग्य सल्लागार अर्जुन सुसे व सपनाताई निखिल सुसे यांच्या मार्गदर्शनाखाली 'आरोग्य पंढरी' शिबिर आयोजित करण्यात आले. दुपारी प्रवचन, हरिपाठ तसेच रात्री श्रीरामकथा अशा विविध कार्यक्रमांना परिसरातील भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत विलास लोखंडे यांनी केले. यावेळी महंत कैवल्यानंद शास्त्री महाराज यांनी मनोगत व्यक्त केले.

डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदाकिनी आमटे यांनी लोखंडे परिवाराच्या संस्कारमूल्यांचे कौतुक करत हेमलकसा प्रकल्पाच्या उभारणीचा प्रेरणादायी प्रवास उपस्थितांसमोर उलगडला. वेदना, संघर्ष आणि सेवाभावातून उभी राहिलेली हेमलकसाची कहाणी समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. नरेंद्र घुले यांनी लोखंडे परिवाराचा संस्कारशील आदर्श समाजासमोर असल्याचे सांगितले. सप्ताहादरम्यान आयोजित रक्तदान शिबिरात ३० रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच संभाजीनगर येथील मधुमेहतज्ज्ञ डॉ. धनश्री वेळंजकर (एम.बी.बी.एस., एम.डी.) यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदाब व मधुमेह तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. अशा विविध समाजोपयोगी



उपक्रमांमुळे सप्ताहाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

या सप्ताहात राम महाराज झिंजुर्के व आदिनाथ महाराज शास्त्री (तारकेश्वर गड) यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून विचार मांडले. तसेच स्वामी प्रकाशानंद गिरीजी महाराज व ज्ञानेश्वर माऊली कदम यांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी माजी आमदार पांडुरंग अभंग, राजश्रीताई घुले, कार्यकारी संचालक अनिलराव शेवाळे, ॲड. भाऊसाहेब गरड, कृष्णा महाराज हारदे, दत्तात्रय महाराज कुलट, गणपत महाराज आहेर, अशोक महाराज बोरुडे, रामेश्वर महाराज कंठाळे, मच्छिंद्र महाराज पानकर, माजी जिल्हा आरोग्य अधिकारी खाडे साहेब, माजी मुळा धरणाचे कार्यकारी अभियंता बडे साहेब, प्रवीण दहातोंडे, प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे, उपसरपंच राजाभाऊ पाऊलबुद्धे यांच्यासह ग्रामस्थ, नातेवाईक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रामेश्वर लोखंडे यांनी केले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# बहिरोबावाडीतील बारवेवर अठराव्या शतकातील मोडी शिलालेख

## ग्रामीण जलव्यवस्थेच्या इतिहासावर प्रकाश । 'लोहोबाईची विहीर'चा उल्लेख; इ.स. १७६२ मधील लोककल्याणकारी जलस्रोत बांधणीचा पुरावा

■ विजय उंडे

● श्रीगोंदा । वीरभूमी –

कर्जत तालुक्यातील बहिरोबावाडी येथील प्राचीन बारवेत आढळलेल्या मोडी लिपीतील शिलालेखामुळे अठराव्या शतकातील ग्रामीण जलव्यवस्था, लोककल्याणाची भावना आणि धार्मिक श्रद्धांचा महत्त्वपूर्ण इतिहास समोर आला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील बहिरोबावाडी गावातील श्री भैरवनाथ महादेव मंदिराशेजारी असलेल्या बारवेवर हा शिलालेख कोरलेला असून त्यातून तत्कालीन समाजजीवनाचे दर्शन घडते.

सदर शिलालेख बारवेच्या पायऱ्या उतरल्यावर समोरील वरच्या कमानीपट्टीवर कोरलेला आहे. तीन ओळींचा हा शिलालेख मोडी लिपीत आणि मराठी भाषेत असून तो कोरीव स्वरूपाचा आहे. वातावरणाचा परिणाम झाल्याने काही अक्षरे अस्पष्ट झाली असली तरी त्याचा कोरीवपणा आजही कायम आहे. शिलालेखाचा छाप घेतल्यानंतर त्यावरील मजकूर स्पष्टपणे वाचता येतो.

**शिलालेखातील मजकूर पुढीलप्रमाणे आहे :**

***श्री लोहोबाईची इहिर ।***
***धनाजी मतकर ।***
***सके १६८४ मध्ये***

या लेखाचा अर्थ असा की, शालिवाहन शक १६८४, चित्रभानू नाम संवत्सर अर्थात इ.स. १७६२ मध्ये धनाजी मतकर यांनी लोहोबाईची विहीर बांधली. त्या काळात बारव, विहिरी आणि दगडी जलस्रोत हे पिण्याच्या पाण्याचे प्रमुख साधन होते. त्यामुळे अशा जलस्रोतांचे बांधकाम हे लोककल्याणाचे महत्त्वपूर्ण कार्य मानले जात असे.

लेखात लोहोबाई या नावाचा उल्लेख आढळून येतो. त्यामुळे जलस्रोत आणि स्थानिक देवतांमधील धार्मिक नाते स्पष्ट होते. महाराष्ट्रात पाण्याच्या स्रोतांना देवतांच्या नावाने समर्पित करण्याची परंपरा प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. यामुळे जलस्रोतांविषयी पावित्र्याची भावना निर्माण होत असे तसेच त्यांचे संरक्षण आणि जतन करण्याची सामुदायिक जबाबदारी समाजात निर्माण होत असे.

शिलालेखात उल्लेख असलेले धनाजी मतकर हे त्या काळातील स्थानिक दाते, गावप्रमुख किंवा सार्वजनिक कार्यात योगदान देणारे व्यक्तिमत्त्व असावे, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे या लेखामुळे स्थानिक इतिहास, वंशपरंपरा आणि ग्रामीण सामाजिक व्यवस्थेच्या अभ्यासाला महत्त्वपूर्ण आधार मिळतो.

शके १६८४ ही कालनोंद या शिलालेखाचा निश्चित कालखंड सांगते. छत्रपती रामराजे महाराजांच्या कालखंडातील हा लेख अठराव्या शतकातील ग्रामीण महाराष्ट्रातील सामाजिक, धार्मिक आणि जलव्यवस्थापन परंपरांच्या अभ्यासासाठी अत्यंत उपयुक्त मानला जात आहे.



अल्पाक्षरी असला तरी हा शिलालेख लोककल्याणकारी जलव्यवस्था, स्थानिक देवतांची उपासना, दानधर्माची परंपरा आणि ग्रामीण सामाजिक इतिहास यांचा महत्त्वपूर्ण दस्तऐवज म्हणून समोर आला आहे.

या शिलालेखाचे संशोधन शिवदुर्ग फाउंडेशनचे राजेश पोपट इंगळे यांनी केले असून वाचन अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे. तसेच शिलालेखाचे शोधकार्य व छाप घेण्यासाठी शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे दिगंबर भुजबळ, सचिन भोसले आणि स्थानिक नागरिकांनी सहकार्य केले.



# कान्हेगाव प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा उत्साहात

## कान्हेगाव रॉकर्स विजेते । महाकाल ११ उपविजेते; पारितोषिकांचे वितरण

● कोपरगाव । वीरभूमी–

तालुक्यातील कान्हेगाव येथे आयोजित करण्यात आलेली कान्हेगाव प्रीमियर लीग (KPL) क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात आणि खेळाडूवृत्तीच्या वातावरणात संपन्न झाली. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात कान्हेगाव रॉकर्स संघाने दमदार कामगिरी करत प्रतिस्पर्धी महाकाल ११ संघावर मात करून विजेतेपद पटकावले.



स्पर्धेदरम्यान विविध संघांमध्ये चुरशीचे सामने रंगले. युवा खेळाडूंनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात उत्कृष्ट कौशल्य दाखवत प्रेक्षकांची मने जिंकली. स्पर्धेत महाकाल ११ संघाने द्वितीय क्रमांक, सप्तश्रृंगी ११ संघाने तृतीय क्रमांक, तर शिव ११ संघाने चतुर्थ क्रमांक मिळविला. अंतिम सामन्यात कान्हेगाव रॉकर्स संघाच्या खेळाडूंनी सर्वांगीण कामगिरी करत विजयावर शिक्कामोर्तब केले.

विजेत्या संघाला मान्यवरांच्या हस्ते चषक, पदके आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. उपविजेत्या संघाचाही सन्मान करण्यात आला. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी आयोजकांचे कौतुक केले.

यावेळी गोदावरी बायोरिफायनरीजचे संचालक सुहास गोडगे, राजेंद्र सांगळे, महसूल अधिकारी आचारी, भाजपाचे तालुका अध्यक्ष विशाल गोरडे, संदीप भाकरे, जालिंदर जगताप, संतोष वाळुंज, ऋषिकेश काजळे, शरद सांगळे आदी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

स्पर्धेचे आयोजन अमोल वाळुंज, अभिलाष चौधरी, सचिन चौधरी, मयूर चौधरी, प्रसाद लहीरे, किरण वाळुंज, प्रदीप हिवराळे, विजय बामरे, शुभम भाकरे, सूरज काजळे, गणेश उचाटे आदींसह युवा खेळाडूंनी केले होते.

कान्हेगाव प्रीमियर लीगमुळे गावातील क्रिकेटप्रेमींना दर्जेदार सामने पाहण्याची संधी मिळाली. पुढील वर्षी ही स्पर्धा आणखी मोठ्या स्वरूपात आयोजित करण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला.

# ज्येष्ठ महिलांनी तयार करावी 'उर्वरित आयुष्याची बकेट लिस्ट': डॉ. श्यामा मंत्री

● अहिल्यानगर । वीरभूमी–

ज्येष्ठ महिलांचे आरोग्य, मानसिक स्वास्थ्य आणि आनंदी जीवनशैली यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने प्रयास नम्रता दादी-नानी ग्रुपच्या वतीने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. ज्येष्ठ महिलांमध्ये वाढत्या वयाबरोबर निर्माण होणारे विविध आरोग्यविषयक प्रश्न, मानसिक तणाव आणि भावनिक आव्हाने याबाबत जागृती घडवून आणण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. श्यामा मंत्री उपस्थित होत्या. त्यांनी 'उर्वरित आयुष्याची बकेट लिस्ट' या विषयावर अत्यंत प्रेरणादायी आणि जीवनाला नवी दिशा देणारे मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका रूपाली निखिल वारे, राजस्थानी महिला मंडळाच्या सल्लागार पुष्पा मणियार, सरस्वती झंवर, दादी-नानीच्या उपाध्यक्षा सुचेता बोरकर, लता आंबेकर, दादी-नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयाताई गायकवाड, प्रयास ग्रुपच्या अध्यक्ष रजनी भंडारी, संस्थापक अध्यक्ष अलकाताई मुंदडा, सचिव हिरा शहापुरे, खजिनदार मेघना मुनोत, ॲड. स्वाती जाधव, सुपर्णा देशमुख, वैशाली क्षीरसागर, उषा सोनी, छाया भंडारी, अरुणा गोयल, कविता शिंगवी, ॲड. ज्योत्स्ना कुलकर्णी, सुजाता कदम, अलका वाघ, सुनिता काळे, सोनाली थोरात, सुरेखा जंगम, हेमा पडोळे, नीलिमा पवार, उषा सोनटक्के, शशिकला झरेकर, जयश्री पुरोहित, सोनी पुरनाळे, लीला अग्रवाल, रेखा फिरोदिया, आशा गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होत्या.

मार्गदर्शन करताना डॉ. श्यामा मंत्री म्हणाल्या की, प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात वेळ ही सर्वात मौल्यवान संपत्ती आहे. एकदा निघून गेलेला वेळ परत मिळत नाही. त्यामुळे आयुष्याच्या उत्तरार्धात किंवा निवृत्तीनंतर वेळ कसा घालवायचा याचा सकारात्मक विचार करणे आवश्यक आहे. अनेक महिला आयुष्यभर कुटुंब, मुलं, नोकरी, व्यवसाय आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळण्यात व्यस्त असतात. मात्र, आयुष्याच्या या टप्प्यावर स्वतःसाठी जगण्याची, स्वतःची स्वप्ने पूर्ण करण्याची आणि आनंद शोधण्याची गरज आहे.

सूत्रसंचालन गौरी जोशी यांनी केले, तर ॲड. स्वाती जाधव यांनी आभार मानले.

# अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण रद्द करण्यासाठी बीड ते मंत्रालय लाँग मार्च

## १५ जूनला अहिल्यानगरात आगमन । नियोजन बैठकीत हजारो भीमसैनिकांच्या सहभागाचा निर्धार

● अहिल्यानगर । वीरभूमी–

अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या प्रमुख मागणीसाठी बीड ते मंत्रालय, मुंबई दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या लाँग मार्चच्या यशस्वी नियोजनासाठी तारकपूर बसस्थानक परिसरातील व्ही स्टार येथे महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीस लाँग मार्चचे प्रमुख संयोजक सिद्धार्थ शिनगारे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी निवृत्ती आरू होते.

यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे, अशोक गायकवाड, सुमेध गायकवाड, परिमल निकम, विजयराव भांबल, संजय खामकर, एन. एम. पवळे, शिवाजी साळवे, अमित काळे, विलास साठे, राजू उभाले, प्रा. जयंत गायकवाड, महेश भोसले, कौशल गायकवाड, विशाल कांबळे, विशाल भिंगारदिवे, विशाल गायकवाड, प्रा डि आर जाधव, सागर ठोकळ, सचिन शेलार, शरद मेढे, प्रा एल बी जाधव, सिद्धार्थ आढाव, समीर भिंगारदिवे, सृजन भिंगारदिवे, दिपक अमृत, शिवाजी भोसले, छानराज क्षेत्रे, मयूर पाखरे, अजय पाखरे, दया गजभिये, पंकज लोखंडे, जयश्री गायकवाड, हनुमंत गायकवाड, वैभव जाधव, संकेत गव्हाले, श्रेयस भिंगारदिवे, सनी भाकरे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक विलास साठे यांनी केले.

बैठकीत माहिती देताना सांगण्यात आले की, १० जून रोजी बीड येथून लाँग मार्चला प्रारंभ होणार असून १५ जून रोजी हा मार्च अहिल्यानगर शहरात दाखल होईल. त्यानंतर विविध जिल्ह्यांतून मार्गक्रमण करत २६ जून रोजी मंत्रालय, मुंबई येथे धडक देण्यात येणार आहे.

यावेळी बोलताना नगरसेवक सुरेश बनसोडे म्हणाले की, समाजहिताला आम्ही नेहमीच प्रथम प्राधान्य देणार आहोत. समाजाच्या प्रश्नांवर संघर्ष करताना कोणताही दबाव आला तरी पदाचा त्याग करण्यासही आम्ही मागेपुढे पाहणार नाही. लाँग मार्चमध्ये सहभागी होणाऱ्या भीमसैनिकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी सर्व आवश्यक व्यवस्था उत्कृष्टपणे करण्यात येतील. तसेच अहिल्यानगर शहरातून मोठ्या संख्येने भीमसैनिक या मार्चमध्ये सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर म्हणाले की, सुरेश बनसोडे यांनी घेतलेले प्रत्येक सामाजिक उपक्रम यशस्वी झाले आहेत. त्यामुळे या लाँग मार्चचे नियोजनही त्यांच्या नेतृत्वाखाली यशस्वी होईल. चर्मकार समाज गावोगावी जाऊन जनजागृती करत असून चर्मकार समाजबांधव मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होणार आहेत. अहिल्यानगर, पुणे आणि मुंबई परिसरातील चर्मकार समाज उपवर्गीकरणाच्या विरोधात एकजुटीने उभा राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



लाँग मार्चचे प्रमुख संयोजक सिद्धार्थ शिनगारे यांनी राज्य सरकारच्या आरक्षण धोरणावर टीका करताना सांगितले की, अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरणाचा मुद्दा पुढे करून विविध समाजघटकांमध्ये मतभेद निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. समाजातील मूलभूत प्रश्नांपासून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी जाती-धर्मांमध्ये संघर्ष निर्माण करण्याचे कारस्थान राबविले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

ते पुढे म्हणाले की, अनुसूचित जातींमधील बहुतांश जाती उपवर्गीकरणाच्या विरोधात आहेत. सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या निर्णयानंतर राज्य शासनाने अनंत बदर आयोगाच्या अहवालाच्या आधारे उपवर्गीकरणाची प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४१ नुसार अनुसूचित जातींशी संबंधित अधिकार राष्ट्रपती आणि संसदेला असल्याने हा निर्णय घटनाबाह्य असल्याचा दावा त्यांनी केला.

या लाँग मार्चद्वारे शासनाकडे काही प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत. त्यामध्ये अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ थांबविणे, अनंत बंदर आयोगाचा अहवाल सार्वजनिक करणे, जातनिहाय जनगणना करणे, अनुसूचित जातींसाठी रिक्त असलेल्या सुमारे ४० टक्के अनुशेष जागा तातडीने भरणे आणि पदोन्नतीतील आरक्षण कायम ठेवणे या मागण्यांचा समावेश आहे.